महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय,
प्रेम लोक पार्क, चिंचवड आकुर्डी रोड,
चिंचवड, पुणे ४११०३३
दूरध्वनी क्र. ०२०-२७३५०५५५

जा.क्र.पोआ/वाचक/ ३४१ /२०१९ दिनांक : ३१ /१०/२०१९

प्रति,

व्यवस्थापक,

-----------------------------------

-----------------------------------

**विषय :- ए.टी.एम. सुरक्षेसंबधी घ्यावयाच्या दक्षते बाबत उपाययोजना.**

--------ooo---------

महोदय,

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील बँका या आपल्या बँकेच्या खातेदारांना त्वरीत अथवा कोणत्याही वेळी सहज पैसे उपलब्ध व्हावेत म्हणुन पोलीस आयुक्तालाचे क्षेत्रामध्ये ठिक ठिकाणी सहज पैसे उपलब्ध व्हावेत म्हणुन ए.टी.एम. बसवून २४ तास सेवा कार्यान्वीत करण्यात आली आहे. परंतू बऱ्याच दिवासा पासुन रात्रीच्या ए.टी.एम. मशिन गॅस कटरच्या साह्याने कापून /फोडुन अथवा पुर्ण ए.टी.एम. उघडून घेवुन जावुन मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटना घडुन पैसे गेल्याचे दिसुन येत आहे. अशा चोऱ्यांना प्रतिबंध आणण्यासाठी पोलीस प्रशासन स्तरावर खालील प्रमाणे उपाय योजना केल्यास मोठ्या प्रमाणावर आळा बसु शकेल.

१) ए.टी.एम. मशिन ही सुरक्षीत ठिकाणी व सहजा सहजी नजरेस दिसेल अशा ठिकाणी बसवावी.
२) ए.टी.एम. मशिन हे निर्जनस्थळी व अडोशाच्या ठिकणी बसवू नये.
३) ए.टी.एम. मशिन ज्या ठिकाणी बसविण्यात आली आहे त्या ठिकाणी चांगल्या प्रतीचे सी.सी. टिव्ही कॅमेरे, ए.टी.एम मशिन व सभोलताचा परीसर कव्हर होईल दिसुन येईल अशा स्थितीत बसवावेत.
४) काही सी.सी. टिव्ही कॅमेरे सहजासहजी नजरेस पडणार नाही अशा स्थितीत बसवावे.
५) ए.टी.एम. मशिन चोरण्याचा, फोडण्याचा अथवा गॅस कटरने कापण्याचा प्रयत्न कोणी केल्यास सायरन वाजले पाहीजे की जेणेकरून सायरनच्या आवाजाने चोरी होणार नाही त्यासाठी सायरन बसविणे.

६) बहुतांश बॅका या ए.टी.एम मध्ये पैसे भरणा करण्यासाठी खाजगी व्यवस्थापनाला काम दिलेले आहे आणि पैशाच्या सुरक्षेबाबत खाजगी व्यावसायीक वॉचमन् ठेवत नाही. (एजन्सीला) ते नेमणेबाबत त्यांना करारनाम्यामध्ये सुचना कराव्यात

७) ए.टी.एम. च्या ठिकाणी व सभोवतली पुरेशा लाईटची व्यवस्था असावी.

८) बॅकानी ए.टी.एम. सुरक्षेबाबत शस्त्रधारी गार्डची /वॉचमन् ची व्यवस्था करावी.

९) ए.टी.एम. फोडताना किंवा कटरच्या सहाय्याने कापून चोरी करताना त्याबाबचा अलर्ट मेसेज/ अलार्म आपल्या मोबईलवर येईल अशी तांत्रिक व्यवस्था करावी.

१०) दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुट्टी असेल अशा वेळी बॅका अथवा खाजगी संस्था पैशाचा भरणा करणाऱ्या संस्था मोठी प्रमाणात रक्कम ए.टी.एम. मध्ये भरतात त्याचा १५ दिवसाच्या वस्तुस्थितीची पहाणी करून आवश्यक तेवढीच कमीत कमी रक्कम रोजच्या रोज ठेवण्यात यावी.

११) ए.टी.एम. मशिन मधुन १५ दिवसामध्ये झालेल्या व्यवहाराच्या वस्तुस्थितीची पहाणी करावी की किती रक्कम ग्राहकांकडून काढली जाते त्या प्रमाणात ए.टी.एम. मध्ये रक्कमेचा भरणा करावा.

१२) एखाद्या ए.टी.एम. ला वॉचमन् ची व्यवस्था असेल आणि गुन्हेगारांच संख्याबळ जास्त असेल तेव्हा वॉचमन्ला सायरन वाजविण्याची व्यवस्था करून ठेवावी.

१३) ए.टी.एम. चे सुरक्षीततेसाठी व रक्कम भरण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीचे/वाहन चालकाचे पोलीस व्हेरिफेशन करणे जरूरीचे असुन त्याचे सर्व पत्ते व फोटो रेकॉर्डवर ठेवावेत.

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी-चिंचवड